# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)

३२ वा मजला, सेंटर वन बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफपरेड, मुंबई - ४०० ००५.

दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७ फॅक्स :(०२२)२२१५१८६७ ई मेल: info.mahasecurity@maharashtra.gov.in


जा.क्र. मरासुम/भरती प्रक्रिया/जाहिरात - २०२०/१८२७ /२०२२ दिनांक : २९/ ०८/२०२२

## ७००० पुरूष सुरक्षा रक्षकांची (कंत्राटी) प्रतीक्षाधीन प्रक्रिया २०२२-२३ (२०२०)

## -: प्रसिध्दीपत्रक - २ :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, भरती प्रक्रिया २०२२-२३ (२०२०) सुधारीत प्रसिध्दीपत्रक महामंडळाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. त्यानुसार दिनांक २०.०८.२०२२ पासुन राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १, ३, ४, ५, ६, ७, ९, ११, १४ येथे उमेदवारांची भरती प्रकिया सुरू करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११ येथील भरती प्रक्रिया दिनांक २५/०८/२०२२ रोजी संपली आहे. तसेच इतर राज्य राखीव पोलीस बलांची भरती प्रक्रिया ही खालील नमुद तक्त्यात दिलेल्या दिनांकास संपणार आहे.

| अ.क्र | भरती केंद्र | भरती प्रक्रिया संपण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ४, नागपुर | दिनांक :- २९/०८/२०२२ |
| २. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. १, पुणे | दिनांक :- ३०/०८/२०२२ |
| ३. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ९, अमरावती | दिनांक :- ३०/०८/२०२२ |
| ४. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ७, दौंड | दिनांक :- ०२/०९/२०२२ |
| ५. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ३, जालना | दिनांक :- ०३/०९/२०२२ |
| ६. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ५, दौंड | दिनांक :- ०३/०९/२०२२ |
| ७. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. गट क्र. ६, धुळे | दिनांक :- ०५/०९/२०२२ |
| ८. | राज्य राखीव पोलीसबल गट क्र. १४, औरंगाबाद | दिनांक :- ०५/०९/२०२२ |

उपरोक्त भरती प्रक्रिया संदर्भात दिनांक १६/०८/२०२२ रोजीपासुन उमेदवारांना व्यक्तीगत मोबाईल क्रमांकावार त्याचप्रमाणे महामंडळाचे संकेतस्थळावर याद्या पसिध्द करुन भरती केंद्र व दिनांक कळविण्यात आले. त्यामध्ये दिनांक २०/०८/२०२२ आणि २२/०८/२०२२ रोजी भरतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना दिनांक १६/०८/२०२२ रोजी संदेश देण्यात आले होते. त्यामुळे त्यांना अल्पवेळ मिळाल्याने भरती प्रक्रिया दिनांक संपल्यानंतरही पुढील तीन दिवस भरतीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. अन्य उमेदवारांना त्यांचे भरती दिनांकाच्या खुप अगोदर संदेश प्राप्त झालेले आहेत.

वर नमुद तक्त्यातील अनु क्र. ०१ ते ०६ या केंद्रावरील उमेदवार त्यांना ठरवून दिलेल्या दिनांकास भरतीसाठी हजर न झाल्यास अशा सर्व उमेदवारांना राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ६ आणि गट क्र. १४, औरंगाबाद येथे भरती प्रक्रियेसाठी दिनांक ०५/०९/२०२२ रोजीपर्यंत हजर राहण्याची संधी देण्यात येत आहे.

सर्व केंद्रांवरील भरती प्रक्रिया दिनांक ०५/०९/२०२२ रोजी संपणार आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांना (विशेषत: गट क्र. ६ व गट क्र. १४ केंद्र असलेले व दिनांक ०३/०९/२०२२ व दिनांक ०५/०९/२०२२ रोजी भरती प्रक्रिया असलेले) याद्वारे कळविण्यात येत आहे की, त्यांनी आपणास नेमुन दिलेल्या भरती केंद्रावर आपणास कळविण्यात आलेल्या दिनांकास किंवा दिनांक ०५/०९/२०२२ रोजीपर्यंतच भरती केंद्रावर भरतीसाठी हजर रहावे. दिनांक ०५/०९/२०२२ रोजी निकष प्रक्रिया संपुष्टात येत असल्याने त्यानंतर उपस्थित राहिलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेत सामील होण्याची संधी मिळणार नाही.

29/08/22

(अश्विनी सानप)

पोलीस अधिक्षक तथा महाव्यवस्थापक

(प्रशासन / वित्त / भरती व प्रशिक्षण)

अतिरिक्त कार्यभार उप व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई

Scanned by CamScanner